असा. क्र. २८ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९ २२४

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, एप्रिल २०, १९९९/चैत्र ३०, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.––फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्याला लागू करताना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. .. | २६४–२६६ |

दिनांक ९ एप्रिल १९९९ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला, महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

(राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २० एप्रिल १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्याला लागू करताना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महिलांच्या कल्याणाच्या दृष्टीने एक महिलाविषयक धोरण जाहीर केले आहे ;

१९७४ चा २. **आणि ज्याअर्थी,** उक्त धोरणाच्या अंमलबजावणीसाठी इतर गोष्टींबरोबर, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १२५ अन्वये देय असलेल्या निर्वाह भत्त्यावरील कमालमर्यादा वाढविण्याकरिता आणि जेथे पत्नी अर्जदार असेल अशा, योग्य त्या प्रकरणांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीकरिता मासिक निर्वाह भत्त्याऐवजी त्या कालावधीसाठी अंतरिम निर्वाह भत्ता व निर्वाह भत्त्याची ठोक रक्कम देण्यासाठी तरतूद करण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्याला लागू करताना तिच्या तरतुदींमध्ये योग्य त्या सुधारणा करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविले आहे ;

आणि ज्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू करताना, उपरोक्त प्रयोजनांसाठी त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणपन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९७४ चा २.

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९८, असे म्हणावे.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ यांच्या कलम १२५ ची सुधारणा. २. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त संहिता" असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू करताना याच्या कलम १२५ मध्ये,— १९७४ चा २.

(अ) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) "जास्तीत जास्त पाचशे रुपये एवढ्या" या मजकुराऐवजी "जास्तीत जास्त पंधराशे रुपये एवढ्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) सध्या असलेल्या परंतुकापूर्वी पुढील परंतुके समाविष्ट करण्यात येतील :—

"परंतु, या पोट-कलमान्वये निर्वाहासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीने अंतरिम निर्वाहासाठी अर्ज किंवा निवेदन केल्यावर व त्यासोबत त्याच्याकडून शपथपत्र सादर करण्यात आल्यावर असा आदेश काढण्यासाठी प्रथमदर्शनी आधार आहे अशी खात्री झाली असेल तर दंडाधिकारी, ज्या व्यक्तीविरुद्ध निर्वाह भत्यासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या व्यक्तीला, तिने अर्जदाराला निर्वाह भत्यासंबंधातील अर्ज अंतिम रीत्या निकालात काढण्यात येईपर्यंत अंतरिम भत्यापोटी योग्य रक्कम देण्याचा निदेश देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, उचित प्रकरणामध्ये उत्तरवादीचे या बाबतीतील म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अशा आदेशात फेरबदल करण्यात येण्यास किंवा तो रद्दही करण्यात येण्यास पात्र असेल या शर्तीला अधीन राहून दंडाधिकाऱ्याला अर्जाची नोटीस देण्यात येईपर्यंत अंतरिम निर्वाह भत्ता देण्यासंबंधात असा एकतर्फी आदेशही देता येईल:

परंतु तसेच, या पोट-कलमान्वये निर्धारित करण्यात आलेल्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, अंतरिम निर्वाह भत्याची रक्कम, व्यवहार्य असेल तेथवर उत्तरवादीच्या मासिक उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा कमी असणार नाही.";

(तीन) विद्यमान परंतुकामध्ये, "परंतु" या शब्दाऐवजी "परंतु तसेच" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(२क) पोट-कलमे (१) व (२) मध्ये अन्यथा काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये पत्नीने निर्वाह भत्यासाठी अर्ज केला असेल त्या बाबतीत अर्जदाराला मासिक निर्वाह भत्याऐवजी ठोक रकमेत निर्वाह भत्ता मिळण्यासाठी आदेश काढण्यात यावा असा अनुतोष देखील मागता येईल आणि दोन्ही पक्षकारांचे वय, शारीरिक अवस्था, आर्थिक स्थिती आणि इतर दायित्वे व बांधिलकी यांसह त्या प्रकरणात निदर्शनास येणारी सर्व परिस्थिती विचारात घेतल्यानंतर, दंडाधिकाऱ्याला, उत्तरवादीने, एका वेळेस पाच वर्षांपेक्षा अधिक होणार नाही एवढा विनिर्दिष्ट कालावधी किंवा पक्षकार परस्परांमध्ये मान्य करतील असा पाच वर्षांपेक्षा अधिक होणारा कालावधी यासाठी मासिक निर्वाह भत्याऐवजी ठोक रकमेत निर्वाह भत्ता द्यावा असा आदेश देता येईल.";

(क) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) "याप्रमाणे" या मजकुरानंतर "यथास्थिति, पोट-कलम (१) अन्वये किंवा पोट-कलम (२-क) अन्वये" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) "संपूर्ण भत्ता" या मजकुरानंतर "किंवा यथास्थिति, मासिक भत्याऐवजी देण्यात येणारी ठोक भत्याची रक्कम" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

३. उक्त संहितेच्या कलम १२७ मध्ये,—

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १२७ ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (१) च्या परंतुकामध्ये, "पाचशे रुपयांहून" या मजकुराऐवजी "पंधराशे रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) "मासिक भत्ता" हा मजकूर जेथे प्रथम येतो तेथे त्याऐवजी "निर्वाह भत्ता" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) "मासिक भत्ता" हा मजकूर दुसऱ्यांदा जेथे येतो तेथे त्यानंतर "मासिक भत्त्याची किंवा, यथास्थिति, ठोक भत्ता" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई